महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेल्या पाणी पुरवठा व मलनि:स्सारण योजनांना अनुदान वितरीत करण्याबाबत.
भोर नगर परिषद, जि. पुणे

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः सुनिअ-२०१८/प्र.क्र.१३/पापु.२२
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, लोकमान्य टिळक मार्ग
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: ६ जून, २०१९

वाचा :

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. नापापु-२००८/प्र.क्र.१/पापु-२२,दि. २२.१०.२००८
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.नापापु-२००८/प्र.क्र.१९८/पापु-२२, दि.२३.१२.२००८
३) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.सुनिअ-२०१३/प्र.क्र.४९२/पापु-२२, दि.१७.०१.२०१४
४) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा विभाग, पुणे यांचे पत्र क्र.ताशा-२/सुनिअ भोर/२०५/२०१४, दिनांक १४.०२.२०१४
५) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.सुनिअ-२०१८/प्र.क्र.१३/पापु-२२, दि.१८.०४.२०१८
६) मुख्याधिकारी, भोर नगरपरिषद यांचे क्र.भोरनप/पापु/सुनिअ/३११५/२०१८, दिनांक ११.१०.२०१८ चे पत्र.

प्रस्तावना :

शासन निर्णय, दि.२२ ऑक्टोबर, २००८ अन्वये नागरी पाणीपुरवठा, मलनि:सारण, शौचालय बांधकाम व घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात पर्याप्त, गुणवत्तापूर्ण सेवा, किफायतशीर सेवाशुल्कामध्ये उपलब्ध करुन देणे व विविध तांत्रिक, आर्थिक व व्यवस्थापकीय सुधारणा करण्याचे उद्दीष्ट निर्धारीत करुन महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान राबविण्यात येत आहे. राज्यातील सर्व नागरीकांना पाणी पुरवठा व मलनि:सारणाच्या सर्वव्यापक सुविधा निश्चितपणे उपलब्ध करुन देणे हा महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

२. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत, शासन निर्णय, दिनांक १७.०१.२०१४ अन्वये भोर शहर पाणी पुरवठा योजनेच्या एकूण रु. ७७.१३ लक्ष किंमतीच्या सुधारणा कामांस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याप्रमाणे सदर योजनेस रु. ६९.४२ लक्ष अनुदान अनुज्ञेय असुन भोर नगर परिषदेच्या स्वहिश्श्याची रक्कम रु. ७.७१ लक्ष आहे. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा विभाग, पुणे यांनी संदर्भ क्र.४ अन्वये भोर शहर पाणी पुरवठा योजनेच्या एकूण रु. ७७,१३,८२६/- इतक्या किंमतीच्या सुधारणा कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता दिली आहे. भोर नगर परिषदेने स्वहिश्श्याची रक्कम रु.७.१५ लक्ष संबंधित बँक खात्यामध्ये जमा केली असुन शासन निर्णय, दि.१८.०४.२०१८ अन्वये रुपये ३१,६४,३४८/- एवढे अनुदान भोर नगर परिषदेस वितरीत करण्यात आले आहे. मुख्याधिकारी, भोर नगरपरिषद यांनी रु. ३८.४८ लक्ष रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले असून सदर योजनेंतर्गत उर्वरित अनुदान वितरीत करण्याची विनंती केली

आहे. मुख्याधिकारी, भोर नगरपरिषद यांनी सादर केलेल्या कामाच्या भौतिक प्रगती अहवालानुसार सदर योजनेचे ९०.८३ % काम पुर्ण झाल्याचे तसेच सदर योजनेचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पडताळणी केलेल्या अहवालाची प्रत सादर केली आहे. मुख्याधिकारी, भोर नगरपरिषद यांनी दिनांक १८.०१.२०१८ च्या पत्रान्वये भोर नगरपरिषदेकडे तांत्रिक अधिकारी उपलब्ध असल्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची आवश्यकता नसल्याचे कळविले असून मुख्याधिकारी, भोर नगरपरिषद यांनी दिनांक २७.१२.२०१८ च्या पत्रान्वये सदर योजनेवर होणाऱ्या खर्चाचे Overall Excess/Saving Statement सादर केले असुन त्यामध्ये सदर योजनेवर रु. ७५,८३,५६९/- इतका खर्च होणार असल्याचे नमूद केले आहे. सदर खर्चामधून ईटीपी चार्जेस वगळता योजनेची सुधारित किंमत रुपये ७०,३२,३५५/- इतकी येते. त्याप्रमाणे सदर योजनेस रु. ६३,२९,१२०/- (९०%) इतके अनुदान अनुज्ञेय आहे. सदर योजनेस यापुर्वी रु. ३१,६४,३४८/- एवढे अनुदान वितरीत करण्यात आले असल्याने वितरीत करावयाच्या शिल्लक अनुदानातून सदर योजनेस उर्वरित रु. १७,०२,१४३/- इतके अनुदान भोर नगर परिषदेस वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत, शासन निर्णय, दिनांक १७.०१.२०१४ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या भोर शहर पाणी पुरवठा योजनेच्या सुधारित कामांकरिता अनुज्ञेय अनुदानापैकी उर्वरित अनुदान रु. १७,०२,१४३/- (सतरा लाख दोन हजार एकशे त्रेचाळीस फक्त) पुढील विवरणानुसार वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(रक्कम रुपयांत)

शहराचे नांव	योजनेची एकूण किंमत	राज्य शासनाकडून अनुज्ञेय अनुदान (९०%)	नागरी संस्थेने निकषानुसार भरावयाची रक्कम (१०%)	नागरी संस्थेने भरलेली रक्कम	यापुर्वी वितरीत करण्यात आलेले अनुदान	आता वितरीत करावयाचे अनुदान
१	२	३	४	५	६	७
भोर	७०,३२,३५५	६३,२९,१२०	७,०३,२३५	७,०३,२३५	३१,६४,३४८	१७,०२,१४३
					एकुण रुपये	**१७,०२,१४३**

२. सदर योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुज्ञेय होणाऱ्या सदर अनुदानावरील खर्च मागणी क्रमांक वाय-२, २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा १९२, स्थानिक संस्था, नगर पालिका इत्यादींना सहाय्य - राज्य योजना - (०२) (०२) नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व जलनि:स्सारण योजनांसाठी सहायक अनुदान (२२१५ १६४७), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी सदर लेखाशिर्षाखाली शासनाकडून उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून उक्त विवरणपत्रातील नमूद स्तंभ क्रमांक ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान वितरीत करावे, तसेच अनुदानाच्या या वितरणाचे स्वतंत्र लेखे ठेवावेत.

३. संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने योजनेसाठी स्वतंत्र लेखे ठेवावेत आणि योजनेचा प्रगती अहवाल व उपयोगीता प्रमाणपत्रे नियमितपणे वेळोवेळी शासनास सादर करावी.

४. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत शासकीय अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधीत नागरी संस्थानी शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक- नापापु २००८/प्र.क्र.१/पापु-२२, दिनांक २२ ऑक्टोबर, २००८ मधील तरतूदीचा अवलंब करणे आवश्यक राहील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१९०६०६१२४२२२००२८** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Mahendra B Hajari

Digitally signed by Mahendra B Hajari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Environment Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2a611aa6775332ae4fb220e8dd3ec11f80d6b95fec14b729156665cff860b06b, serialNumber=4d2c04ec5ad8ef37ec32a9360d83d2731bb0d44617af98bbd8b8b0fbdbc2a914, cn=Mahendra B Hajari
Date: 2019.06.06 14:43:52 +05'30'

(म.बा.हजारी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

- मा.मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
- मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
- मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
- मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव,विधानमंडळ सचिवालय, मुंबई
- अपर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
- महालेखापाल १ -मुंबई/नागपूर.
- विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
- सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
- संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
- जिल्हाधिकारी, पुणे
- संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा विभाग, पुणे.
- जिल्हा प्रकल्प अधिकारी (नगरपालिका), जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
- जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
  मुख्याधिकारी, भोर नगर परिषद, जि. पुणे
- वित्त विभाग/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

- कक्ष अधिकारी, पापु.०४, पापु-०५, पापु.२०,पापु.२१, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
- निवडनस्ती, पापु-२२.